॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Phone: (02462) 215556
Mobil.No: 8788218638

**OFFICE OF THE DIRECTOR**
**SPORTS & PHYSICAL EDUCATION**

website: srtmun.ac.in
E-mail: sports@srtmun.ac.in
dir.sports@srtmun.ac.in

संदर्भ : क्रीडा/२०२४—२५/१५७ दिनांक : १०/०९/२०२४

**महत्वाचे/तात्काळ**

प्रति,

**मा. प्राचार्य,**
सर्व संलग्नित महाविद्यालये,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

**मा. संचालक,**
विद्यापीठ परिसर शैक्षणिक संकुले,
प्रस्तुत विद्यापीठ

**मा. संचालक,**
उप परिसर, परभणी/लातूर
प्रस्तुत विद्यापीठ

विषय : महाराष्ट्रातील सर्व शाळा, विद्यापीठे व उच्च व तंत्र शिक्षण संस्थेमध्ये मुलींना तीन महिण्यांचा कराटे प्रशिक्षण कार्यक्रम तात्काळ आयोजित करणे बाबतच्या परिपत्रकाची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे बाबत...

संदर्भ : मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रं. उशिसं/मवि—१/महिला धोरण/२०२४

महोदय,

वरील विषयास व संदर्भिय पत्रास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, विद्यापीठाशी संलग्नित सर्व शिक्षण संस्थांनी मुलीसाठी तीन महिन्यांचा **कराटे प्रशिक्षण कार्यक्रम** किमान एकदा राबविणे बाबत कळविण्यात आले आहे.

तरी याबाबतची कार्यवाही आपल्यास्तरावर करण्यात यावी व झालेला कार्यवाहीचा अहवाल क्रीडा विभागाच्या या **sports@srtmun.ac.in** वर तसेच **mavi.dhepune@gov.in** या ई—मेल पाठविण्यात यावा.

करीता आपल्या माहितीस्तव.

प्र. संचालक,
क्रीडा व शारीरिक शिक्षण

**प्रत माहितीस्तव :**
०१. मा. कुलगुरु महोदय यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
०२. मा. कुलसचिव, प्रस्तुत विद्यापीठ

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण),
४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर ४११०१६.
Web : www.dhepune .gov. in E-Mail :mavi. dhepune@gov.in
फोन नं.020/26122119,26051512,26130627,26124639 फॅक्स नं. 020/26111153.

05 SEP 2024
3466

क्र.: उशिसं/मवि-१/महिला धोरण /२०२४/ दिनांक: .२०२४

Sports Department
Inward No. 332
Date of Received 06/09/24.

प्रति,
१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण.
२. कुलसचिव, सर्व अकृषी/अभिमत/स्वयं अर्थसहायित विद्यापीठे.

**विषय : महाराष्ट्रातील सर्व शाळा, विद्यापीठ व उच्च व तंत्र शिक्षण संस्थेमध्ये मुलींना तीन महिण्यांचा कराटे प्रशिक्षण कार्यक्रम तात्काळ आयोजित करणेबाबतच्या परिपत्रकाची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेबाबत..**

संदर्भ: १. श्री. अमर अनिता जालिंदर एकाड, संस्थापक, दीपू फाऊंडेशन यांचे पत्र दि. ३०.८.२०२४
२. संचालनालयाचे परिपत्रक क्र.: उशिसं/मवि-१/महिला धोरण/२०२४/१३०२ दि. २२.२.२०२४

संदर्भांकित पत्रांच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, महिला धोरण २०१४ मधील मुद्दा क्र. ६.१३ अन्वये "सर्व शिक्षण संस्थांनी मुलींसाठी तीन महिन्यांचा कराटे प्रशिक्षण कार्यक्रम किमान एकदा राबविणे." सूचित करण्यात आले आहे.

उपरोक्त सूचनेनूसार कार्यवाही करणेबाबत, आपल्या स्तरावरुन सर्व संलग्नित महाविद्यालयांना विनाविलंब कळविण्याबाबत तसेच विद्यापीठांना विद्यापीठ स्तरावर उपरोक्त सूचनेची अंमलबजावणी करण्याबाबत संदर्भ क्र. २ अन्वये कळविण्यात आलेले आहे.

संचालनालयाचे पत्र दि. २२.२.२०२४ च्या अनुषंगाने पुढीलपैकी योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. -

१. विभागीय सहसंचालक कार्यालयांच्या/विद्यापीठांच्या स्तरावरुन करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल तात्काळ संचालनालयास सादर करावा.
२. ज्या विभागीय सहसंचालक कार्यालयांकडून/विद्यापीठांकडून अद्याप कार्यवाही झालेली नाही त्यांनी तात्काळ कार्यवाही करुन त्याबाबचा अहवाल संचालनालयास सादर करावा.
३. विभागीय सहसंचालक कार्यालयांनी/विद्यापीठांनी सूचना दिल्यानंतर महाविद्यालयांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आपल्या स्तरावर संकलित करुन एकत्रित स्वरुपात संचालनालयास सादर करावा तसेच ज्या महाविद्यालयांनी अद्याप आपल्या निर्देशानूसार कार्यवाही केली नसेल अशा महाविद्यालयांबाबत आपल्या स्तरावरुन करण्यात येत असलेल्या कारवाईबाबत संचालनालयास अहवाल सादर करावा.

Sports
05.9.24

अधिसभा मेंदूर विद्यापीठातील सर्व महाविद्यालयास माहीती पाठवावी.
6/9/2024

उपरोक्तपैकी जी कार्यवाही करण्यात आली असेल/करण्यात येत आहे त्याबाबतचा अहवाल संचालनालयाच्या mavi.dhepune@gov.in या ई-मेल आय.डी. वर तात्काळ सादर करावा.

Signed by
Shailendra Kamlakar Deolankar
Date: 05-09-2024 15:59:48

**(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)**
शिक्षण संचालक
उच्च शिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, पुणे-४११०१६.